॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक २४४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

* सुविचार *
संयम हेच खरे औषध.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### तोंडमारा

महापुरुषांची उंची अशी
गाठता येते का सरळ
अधूनमधून बाग देऊन
फक्त ओकायची गरळ

बेताल वक्तव्ये झालीत
प्रसिध्दीचाच एक भाग
कोणी कोणाला आणावी
कोणत्या विचारांनी जाग

## SPOT NEWS

### अरणगावात मुलाकडून बापाची हत्या

● **अहिल्यानगर** – तालुक्यातील अरणगाव येथे मुलानेच बापाची कोयत्याने वार करून हत्या केल्याची घटना घडली आहे. शेजार्यांना शिवीगाळ करु नको असे सांगितल्याने वडिलांनी मुलाला कोयत्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी मुलाने बापाच्या हातातील कोयता हिसकावून त्याच कोयत्याने व काठीने वडिलांना मारहाण केली. या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला. पोटच्या मुलानेच बापाची हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की रविवार दि. २६ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मयत वडील रावसाहेब उर्फ (बबन) विठ्ठल सोनवणे (वय ६८, रा. अरणगाव) हे शेजार्यांना शिवीगाळ करित होते. यावेळी मुलगा अशोक रावसाहेब सोनवणे (वय २४) याने वडीलांना शेजार्यांना शिविगाळ करु नका असे सांगितले. मात्र वडिलांनी आपल्या मुलालाच कोयत्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी मुलाने वडिलांच्या हातातील कोयता हिसकावून घेऊन वडिलांना कोयता व त्या ठिकाणी असलेल्या काठीने पाठीवर व पोटावर मारहाण केली. या मारहाणीत रावसाहेब सोनवणे हे गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडले. त्यांना तातडीने जामखेड येथील खासगी रुग्णालयात घेऊन गेले व नंतर ग्रामीण रुग्णालयात आणले. यावेळी तेथील डॉक्टरांनी रावसाहेब सोनवणे मयत झाले असल्याचे सांगितले.

# अहिल्यानगरचा राजकीय दबदबा वाढला

## आमदारांची संख्या १७ वर । विधान परिषदेसाठी विवेक कोल्हे, सुनील कर्जतकर यांना उमेदवारी


विवेक कोल्हे | सुनील कर्जतकर | माधवी नाईक | संजय भेंडे | प्रमोद जठार | प्रज्ञा सातव

● **मुंबई । वीरभूमी** –
विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने मंगळवारी उशिरा रात्री पाच उमेदवारांची घोषणा केली. या यादीत अपेक्षेप्रमाणे पक्षाच्या निष्ठावान आणि जुन्या कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली आहे. उमेदवारांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील विवेक कोल्हे आणि सुनील कर्जतकर (सध्या मुंबईस्थित) यांच्यासह पक्षाच्या सरचिटणीस माधवी नाईक, सिंधुदुर्गचे माजी आमदार प्रमोद जठार आणि संजय भेंडे यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. पाच उमेदवार उभे करून ही निवडणूक बिनविरोध करण्याचे संकेत भाजपने दिले आहेत.

उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० एप्रिल आहे. नऊ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत भाजपने पाच उमेदवार जाहीर केले आहेत. तसेच एका जागेच्या पोटनिवडणुकीसाठी प्रज्ञा सातव यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

मुळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत-जामखेडचे मात्र पुणे-मुंबईत राहुन ४० वर्षे पक्ष संघटनेत काम करणारे सुनील कर्जतकर हे पक्षातील अनुभवी आणि जुने कार्यकर्ते असून त्यांनी संघटनेत विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. कोपरगावचे विवेक कोल्हे हे माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे पुत्र आहेत.

जिल्ह्यात सध्या १२ विधानसभा आमदार आहेत. त्याशिवाय नाशिक शिक्षक मतदारसंघातून संगमनेरचे सत्यजित तांबे प्रतिनिधित्व करतात. विधान परिषदेत प्रा. राम शिंदे सभापती म्हणून कार्यरत आहेत, तर पाथर्डीचे शिवाजीराव गर्जे हेही आमदार आहेत. आता सुनील कर्जतकर आणि विवेक कोल्हे यांची निवड जवळपास निश्चित मानली जात असल्याने जिल्ह्यातील आमदारांची संख्या १७ वर पोहोचली आहे. हा एक ऐतिहासिक विक्रम ठरला आहे.

कर्जत-जामखेड मतदारसंघातून सर्वाधिक तीन आमदार असून संगमनेर व शेवगाव-पाथर्डीत प्रत्येकी दोन आमदार आहेत. कोपरगावमधूनही आता दोन आमदार असतील.

विधानसभेच्या राजकारणात काळे आणि कोल्हे कुटुंबातील संघर्ष दीर्घकाळ पाहायला मिळाला. यापूर्वी एका कुटुंबालाच आमदारकी मिळत होती, मात्र यावेळी दोन्ही कुटुंबांना प्रतिनिधित्व मिळणार आहे.

### प्रज्ञा सातव यांना पुन्हा संधी

■ काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या प्रज्ञा सातव यांनी डिसेंबर २०२५ मध्ये आमदारकीचा राजीनामा दिला होता. विधान परिषद पोटनिवडणुकीसाठी भाजपने त्यांनाच उमेदवारी दिली आहे. ही निवडणूकही बिनविरोध होण्याची शक्यता आहे. या जागेचा कार्यकाळ जुलै २०३० पर्यंत राहणार आहे.

### अमित शाहांचा शब्द पाळला; कोल्हेंना निष्ठेचं फळ

■ विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोपरगावचे युवा नेते विवेक कोल्हे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय भाजप नेतृत्वाने घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या चर्चेनंतर त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. कोल्हे हे कोपरगाव विधानसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक होते, मात्र पक्षाच्या रणनीतीनुसार त्यांना माघार घ्यावी लागली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांना दिल्लीत बोलावून पक्षाची भूमिका स्पष्ट केली होती. त्यावेळी दिलेला शब्द आता पूर्ण केल्याचे मानले जात आहे. राज्यसभा निवडणुकीवेळीही त्यांचे नाव चर्चेत होते, परंतु सामाजिक आणि राजकीय समीकरणांमुळे त्यांना संधी मिळाली नव्हती. फडणवीस आणि कोल्हे यांच्यातील अलीकडील भेट ही उमेदवारी निश्चित करणारी ठरली. या निर्णयामुळे उत्तर महाराष्ट्रात भाजपच्या तरुण नेतृत्वाला बळ मिळणार आहे.

## बेलापुरचा भोंदूबाबा गणेश शिंदेला २ मेपर्यंत पोलीस कोठडी

● **श्रीरामपूर । वीरभूमी** –
गेल्या ३ वर्षांपासून सतत अत्याचार केल्याच्या आणि तंत्र-मंत्र करून आजार बरे करण्याच्या नावाखाली २० लाख रुपये घेतल्याच्या गुन्ह्याखाली बेलापूर येथील गणेश शिंदे या भोंदू बाबाला अटक करण्यात आली आहे. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने २ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री. जाधव यांच्या न्यायालयासमोर गणेश शिंदे या बाबाला उभे केले होते. सदर बाब संवेदनशील असून, यामध्ये गुंगीच्या औषधांचा वापर केला असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी बाबाला पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी सरकारी पक्षातर्फे करण्यात आली.

सरकारी पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने गणेश शिंदे या बाबास २ मेपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील एस. आर. माडेकर यांनी बाजू मांडली. बेलापूर येथे गणेश शिंदे या बाबाने दावल मलिक न्यासाची स्थापना करून भाविकांना लुबाडण्याचा गोरखधंदा सुरू केला होता.

## सरपंचपदाच्या निवडणुकीत दिवंगत संतोष देशमुखांच्या पत्नीचा पराभव

● **बीड । वीरभूमी** –
मस्साजोगच्या सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नीचा पराभव झाला आहे. दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा स्वरूपानंद देशमुख यांनी पराभव केला आहे. अवघ्या ९२ मतांनी अश्विनी देशमुखांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे. स्वरूपानंद देशमुख हे मस्साजोगचे सरपंच झाले असून त्यांना १८ महिन्यांचा कार्यकाळ मिळणार आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी हत्या झाल्याने या रिक्त पदासाठी झालेल्या निवडणुकीत त्यांच्या पत्नी अश्विनी देशमुख तसेच स्वरूपानंद देशमुख यांच्यात लढत झाली. अश्विनी देशमुख यांच्यासाठी त्यांची मुलगी वैभवी आणि मुलगा विराज यांनीही घरभेटी देत मतदान मागितलं. दिवंगत देशमुख यांची सहानुभूती तसेच त्यांनी केलेल्या विकास कामांचाही उहापोह निवडणुकीत झाला.

अश्विनी देशमुख यांनी दिवंगत संतोष देशमुख यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी साथ देण्याचे आवाहन केले होते. तर स्वरुपानंद देशमुख यांनी त्यांच्या कार्यकाळात गावासाठी केलेल्या कामांच्या जोरावर गावक-यांकडे मतांचे दान मागितले होते.

मस्साजोगच्या सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत २०८४ पैकी १७४४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदानावेळी मतदान केंद्रबाहेर दोन्ही गट समोरा-समोर देखील आल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु, पोलिसांनी वेळी हस्तक्षेप करत परिस्थिती आटोक्यात आणली होती.

खरेतर ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले होते. हे प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर झालेल्या लढतीत मस्साजोगकरांनी स्वरूपानंद देशमुख यांच्या बाजूने कौल दिला आहे.

# शेवगावात अवैध गोमांस विक्रीवर पोलिसांचा छापा

## तब्बल १७० किलो साठा जप्त । आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करुन अटक

● **शेवगाव । वीरभूमी** –
शहरातील खाटीक गल्ली परिसरात गोमांसाची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर शेवगाव पोलिसांनी छापा टाकून ही कारवाई केली. या कारवाईत पथकाने तब्बल १७० किलो गोमांस व इतर साहित्य जप्त करत एकाला अटक केली आहे.

दोन दिवसापुर्वीच सकल हिंदू समाजाच्यावतीने निवेदन देवून गोसंरक्षण व स्थानिक स्तरावर संबंधित व्यवसायांचे शासकीय नियमांनुसार नियमन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करत तहसीलदारांना निवेदन दिले होते. यानंतर पोलिस प्रशासन अलर्ट मोडवर आले.




पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, शहरातील खाटीक गल्ली येथे काही व्यक्ती गोमांस विक्री करत असल्याचे समजले. त्या माहितीची खातरजमा करुन तात्काळ एक पथक नेमून घटनास्थळी छापा टाकण्याचे आदेश दिले. यानंतर संबधित पथकाने सदरील ठिकाणी छापा टाकून छाप्यात संशयित आरोपीकडून गोमांस साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेल्या गोमांसाची किंमत अंदाजे हजारो रुपयांमध्ये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कारवाई दरम्यान काही साहित्यही जप्त करण्यात आले असून त्यामध्ये वजनकाटा, चाकू, लोखंडी साखळी आदींचा समावेश आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास शेवगाव पोलीस करत आहेत.

## राज्यात पुन्हा अवकाळी पावसाचे संकट

● **मुंबई । वीरभूमी** –
सध्या संपूर्ण महाराष्ट्रात कडक उन्हाने ग्रासला आहे. एकीकडे तापमानाचा पारा वाढत असताना हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, पुढील २ ते ३ दिवसांत राज्यातील अनेक भागांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. ऐन उन्हाळ्यात पाच जिल्ह्यांमध्ये पावसाचा सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हवेच्या कमी दाबाचा पट्टा विस्तारल्यामुळे ही स्थिती निर्माण झाली असून उष्णतेच्या तीव्र लाटेपासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

फक्त राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात उन्हाचा कडाका पहायला मिळत आहे. राज्यातील अनेक भागातील तापमान ४५अंशांच्या वर गेले आहे. अशामध्ये पुढील काही तासांत हवामानामध्ये बदल होण्याची शक्यता वर्तविली आहे. हवामान खात्याने सांगितल्यानुसार, विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये बुधवारपर्यंत (२९ एप्रिल) तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या सरींचा अंदाज वर्तविला आहे. तसेच, राज्यात १ मे आधी पुन्हा पश्चिमेकडील वारे सक्रिय होत आहेत. त्यामुळे तापमानात घट होण्याची शक्यता आहे. मुंबईसह कोकण किनारपट्टीवर तापमान सरासरीपेक्षा कमी राहणार असून मध्य महाराष्ट्रात तापमान ३८ अंशांपर्यंत जाणार घटणार आहे.

# SPOT NEWS

## नितीन शिरसाठ हत्याकांडातील आरोपींना अटक करण्याची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खुनातील आरोपींना तात्काळ अटक करावी व त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी शिरसाठ कुटुंबीयांसह गावातील महिलांनी सोमवारी (दि. २७ एप्रिल) जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण केले. या आंदोलनात महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. या उपोषणात स्वाती नितीन शिरसाठ, शारदा शिरसाठ, स्वाती शिरसाठ, आशा आल्हाट, उषा शिरसाठ, वंदना शिरसाठ, तेरेसा शिरसाठ, वैशाली मगर, नंदा साळवे, शिवबा साळवे, रोहिणी गायकवाड, पल्लवी हिवाळे, सविता शिरसाठ यांसह अनेक महिला सहभागी झाल्या होत्या. दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी घोडेश्वरी हॉस्पिटल, घोडेगाव (ता. नेवासा) येथे नितीन शिरसाठ यांची भरदिवसा गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेला तब्बल ७० ते ८० दिवस उलटूनही आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेले नाहीत. मृत नितीन शिरसाठ यांच्या पत्नीने अत्यंत भावनिक शब्दांत आपली व्यथा मांडताना सांगितले की, मी त्या घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित होते. आमची ३ महिन्यांची मुलगी आहे व आणखी पाच लहान मुले आहेत. आरोपी अजूनही मोकाट असल्याने आमच्या कुटुंबावर केव्हाही हल्ला होऊ शकतो. पोलीस प्रशासनावर नेमका कोणाचा दबाव आहे? असा सवालही कुटुंबीयांनी उपस्थित केला.

## घोसपुरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाचे भव्य आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

घोसपुरी ग्रामस्थांच्या सहकार्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन, संविधानकर्ते युवा प्रतिष्ठान यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात विविध वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांद्वारे महापुरुषांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात गुरुवार, दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता 'बुद्धवंदना'ने होणार आहे. सकाळी १० ते ११ या वेळेत धम्मदेशना, धम्मपूजन, ध्वजारोहण तसेच धार्मिक व सामाजिक विषयांवर मान्यवरांचे मनोगत होणार आहे. यानंतर दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार असल्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. सायंकाळी ८ ते ९ या वेळेत 'समाज प्रबोधन विचारमंथन' या कार्यक्रमांतर्गत प्रख्यात वक्ते मा. श्री. शिवव्याख्याते अभय गुलाबराव जावळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच रात्री ९ वाजता सर्वांसाठी सहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री १० वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका कडुबाई खरात व त्यांच्या टीमकडून भीम गीतांचा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला जाणार आहे, ज्यामुळे जयंती महोत्सवात उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. या कार्यक्रमास घोसपुरी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन, संविधानकर्ते युवा प्रतिष्ठान तसेच ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वीजेसाठी पारनेरच्या पश्चिम भागातील शेतकरी आक्रमक

### पळसपुर सबस्टेशनवर आंदोलन । कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे पाणी असूनही पिके धोक्यात

**● पारनेर । वीरभूमी –**

विद्युत पुरवठ्यातील अनियमितता आणि कमी दाबामुळे त्रस्त झालेल्या पारनेर तालुक्यातील पळसपुर, काटाळवेढा आणि म्हसोबा झाप परिसरातील शेतकरी प्रशासनाविरोधात एकवटले आहेत. गावात सबस्टेशन उपलब्ध असूनही सुरळीत वीजपुरवठा होत नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी आंदोलन छेडले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष चे नेते अमोल उगले व म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी पळसपुर सबस्टेशनवर धडक देत निषेध नोंदवला.

या भागात कांदा, टोमॅटो, मिरची, भुईमूग आणि फळबागांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. सध्या उन्हाच्या तीव्रतेमुळे पाण्याची पातळी घटली असून उपलब्ध पाणी पिकांना देण्यासाठी विजेची गरज आहे. मात्र, कमी व्होल्टेजमुळे शेतीपंप सुरू होत नसल्याने पिके वाळण्याच्या मार्गावर आहेत.



सरकारच्या Revamped Distribution Sector Scheme (आरडीएसएस) योजनेअंतर्गत या भागात कामे प्रस्तावित होती. मात्र ती अद्याप अपूर्ण असून नवीन वीज जोडण्या व पायाभूत सुविधा रखडल्या आहेत. याबाबत सरपंच प्रकाश गाजरे यांनी प्रशासनाला तीव्र शब्दांत धारेवर धरत कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली.

वारंवार तक्रारी करूनही अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. सामाजिक कार्यकर्ते प्रवीण आहेर यांनी सबस्टेशन असूनही सेवा मिळत नसेल तर ते प्रशासनाचे अपयश आहे, अशी टीका केली.

पळसपुर येथील आरडीएसएस योजनेचे काम पूर्ण झाले असून वीज जोडणी बाकी आहे. ती त्वरित न झाल्यास २९ एप्रिल २०२६ रोजी टाकळी ढोकेश्वर सबस्टेशनवर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सरपंच प्रकाश गाजरे यांनी दिला आहे.

गावात सबस्टेशन असूनही कमी दाबाने वीज मिळणे हा मोठा निष्काळजीपणा आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर आंदोलन अधिक उग्र होईल, असा इशारा अमोल उगले व प्रकाश गाजरे यांनी दिला.

या आंदोलनात अमोल उगले, प्रकाश गाजरे यांच्यासह प्रवीण आहेर, अभय आहेर, आशुतोष आहेर, संजय आहेर, अनिकेत अडसरे, राजेश ढोले, राजू आहेर, सुनील आहेर, विनायक आहेर, मयूर शिंदे, तुषार अडसरे, बंटी वाघमारे, गणेश आहेर, सागर ढोले व मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते.

आंदोलनानंतर आता महावितरण प्रशासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## सरोज आल्हाट यांना 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' प्रदान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

येथील कवयित्री, सामाजिक कार्यकर्त्या व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना भारत सरकारच्या नीती आयोग संलग्नित डॉ. मणिमाई देसाई प्रतिष्ठान व आरोग्य सेवा संस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचा 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांना त्यांच्या बहुआयामी योगदानाबद्दल देण्यात आला आहे.



पुणे येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह येथे पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी खादी व ग्रामोद्योग मंत्री रवींद्र साठे यांच्या हस्ते आल्हाट यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. रवींद्र भोळे यांनी सांगितले की, साहित्य, समाजसेवा, पत्रकारिता तसेच सांस्कृतिक क्षेत्रात सरोज आल्हाट यांनी अनेक वर्षे सातत्याने केलेले कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेत त्यांना राष्ट्रीय स्तरावरील या पुरस्काराने गौरविण्यात आले असल्याचे स्पष्ट केले.

सरोज आल्हाट या केवळ कवयित्री म्हणूनच नव्हे, तर सामाजिक प्रश्नांवर लेखन व जनजागृती करणाऱ्या सक्रिय कार्यकर्त्या म्हणूनही ओळखल्या जातात. रुग्णसेवा देखील त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून सुरु आहे. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग उल्लेखनीय असून त्यांनी महिलांविषयक, शिक्षण आणि समाजजागृती विषयांवर प्रभावी काम केले या कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

यापूर्वीही त्यांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना सदरचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# सिजेंटा व सिंबा कंपनीच्या टरबूज रोपांमुळे कोपरगावच्या शेतकऱ्यांचे नुकसान

### कारवाईसाठी आ. आशुतोष काळे यांचे कृषी मंत्र्यांना निवेदन

**● कोपरगाव । वीरभूमी–**

रब्बी हंगामातील नुकसान भरून काढण्याच्या आशेवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना निसर्गासोबतच बियाणे कंपन्यांकडूनही फटका बसत असल्याचा प्रकार समोर आला आहे. आशुतोष काळे यांनी अशा कंपन्यांवर कडक कारवाई करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याची मागणी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली आहे.



कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील टरबूज लागवड करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी विविध नर्सरीमधून डूपसशपींर (सिजेंटा) व डळालर ड्शशवी (सिंबा) कंपनीची टरबूज रोपे खरेदी करून लागवड केली होती. मात्र ही रोपे निकृष्ट दर्जाची असल्याने पिके रोगराईला बळी पडली आणि मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

या संदर्भात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीने २५ मार्च रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीत सुमारे २५ एकर क्षेत्रातील टरबूज पिकाचे १०० टक्के नुकसान झाल्याचा अहवाल देण्यात आला. तसेच संबंधित कंपन्या शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत असताना निकृष्ट दर्जाची रोपे देऊन कंपन्यांनी त्यांचे नुकसान वाढविले असल्याचे आमदार काळे यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी कंपन्यांवर कडक कारवाई करावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

याबाबत स्वतः लक्ष घालून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. आमदार आशुतोष काळे यांनी तातडीने प्रश्न मांडल्यामुळे सकारात्मक कार्यवाही होईल, असा विश्वास नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# अहिल्यानगरचा महेश जंजिरे सी.आर.पी.एफ. मध्ये बनलाय असिस्टंट कमांडट

### निवडीबद्दल अहिल्यानगर जिल्ह्यातर्फे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला विशेष गौरव..!

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगरच्या मातीचा आणखी एक हिरो देशसेवेसाठी सज्ज झाला आहे. महेश ईश्वर जंजिरे यांनी यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून सी आर पी एफ मध्ये थेट असिस्टंट कमांडंट म्हणून दमदार एंट्री घेतली आहे.

दिल्लीतील सीआरपीएफ कॅडमीमध्ये खडतर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर आता त्यांची नियुक्ती जम्मू-काश्मीरमधील संवेदनशील कुपवाडा सेक्टरमध्ये झाली आहे. म्हणजेच थेट देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या फ्रंटलाईनवर ते उभे राहणार आहेत.

या अभिमानास्पद यशाबद्दल महेश जंजिरे यांचा अहिल्यानगर जिल्हयाच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आमदारांनी महेश जंजिरे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या यशाचा गौरव केला.

महेश जंजिरे यांनीही तरुणांसाठी एक पॉवरफुल मेसेज दिला. सीआरपीएफ ही देशातील सर्वात मोठी पोलीस कॅडर संस्था असून, देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी कायम तत्पर आहे, असे जंजिरे म्हणाले. इच्छुक व जिद्द असलेल्या युवकांना यूपीएससी आणि स्पर्धा परीक्षांसाठी मोफत मार्गदर्शन करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

याच कार्यक्रमात त्यांच्या महेश जंजिरे यांच्या पत्नी वास्तुविशारद काजल जंजिरे यांचाही सन्मान करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील बहादुरगड या किल्ल्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशावर आधारित अभ्यासावर त्यांनी केलेल्या संशोधनाला दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय संस्थेकडून प्रशस्तीपत्र मिळाले असून, ते संग्राम जगताप यांच्या हस्ते काजल जंजिरे यांना प्रदान करण्यात आले.

अहिल्यानगरचे प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, बांधकाम व्यावसायिक ईश्वर जंजिरे, बचत गटाच्या नेत्या सुनीता जंजिरे, ॲड. सविता बोठेपाटील, यश बोठेपाटील यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

एकीकडे देशसेवा आणि दुसरीकडे संशोधनातून संस्कृती जपण्याचा प्रयत्न करीत असल्याने जंजिरे कुटुंब आज अनेक तरुणांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.



वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
जिल्ह्यातील आधुनिक २०० मीटर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक स्केटिंग रिंकवर प्रथमच आयोजित करण्यात आलेली राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२६ उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडली. संध्याकाळच्या आकर्षक वातावरणात झालेल्या या स्पर्धेने जिल्ह्यातील स्केटिंग क्षेत्राला नवी दिशा दिली. या भव्य स्पर्धेचे आयोजन राजस्व स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक तथा अध्यक्ष चेतन शहाणे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीचे मुख्य मार्गदर्शक व आंतरराष्ट्रीय स्केटिंगपटू प्रशांत पाटोळे यांनी केले. स्पर्धेमध्ये विविध वयोगटांतील खेळाडूंनी शानदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली. मुलांच्या गटात सोहम शिंदे, कार्तिक नान्नावरे, जय भंडारी, विआन मुथा आणि विआन पितळे यांनी दमदार प्रदर्शन केले. यामध्ये सोहम शिंदे याने सुवर्णपदक पटकावत विशेष लक्ष वेधून घेतले. तर मुलींच्या गटात ईश्वरी आव्हाड, श्रीनिधी गायकवाड, सई नागरे, सिद्धी घोडेस्वर आणि राजनंदिनी कांडेकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदकांची कमाई केली. वरील सर्व खेळाडू राजस्व स्पोर्ट्स क्लब, सावेडी तसेच टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमी, बुरुडगाव रोड व वाडियापार्क येथे नियमित सराव करतात. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे हे यश मानले जात आहे. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यासह सोलापूर, जालना, शिरूर, श्रीरामपूर तसेच विविध तालुक्यांतील नामांकित शाळा व स्केटिंग अकॅडमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# खरीप हंगाम यशस्वीतेसाठी सर्व विभागांनी सामूहिक प्रयत्न करावेत

### आ. आशुतोष काळे । कोपरगावात पूर्वनियोजन बैठकीत सूचना । खतसाठा, पाणी व्यवस्थापन व शेतकरी हितावर भर

**● कोपरगाव । वीरभूमी –**
लहरी मान्सूनमुळे यंदाच्या खरीप हंगामावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात असताना, शेतकऱ्यांच्या अडचणी कमी करण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे आणि सर्व विभागांनी समन्वयाने काम करून खरीप हंगाम यशस्वी करावा, अशा सूचना आशुतोष काळे यांनी दिल्या.



सोमवार (दि. २७) रोजी कोपरगाव येथील पंचायत समिती कार्यालयात कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत खरीप हंगाम पूर्वनियोजन व आढावा बैठक पार पडली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या संभाव्य अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, वेळेवर पाऊस न पडणे व शेतीमालाला मिळणारा अनिश्चित दर यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहे. तरीही शेतकरी मोठ्या धैर्याने खरीप हंगामाची तयारी करत आहे. त्यामुळे प्रशासनाने आपली जबाबदारी ओळखून शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी.

खत निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल परदेशातून आयात होत असल्याने जागतिक परिस्थितीचा परिणाम खत पुरवठ्यावर होऊ शकतो. त्यामुळे संभाव्य तुटवडा टाळण्यासाठी आतापासूनच नियोजन करून तालुक्यासाठी पुरेसा खतसाठा उपलब्ध करून द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच बियाणे व खतांच्या गुणवत्तेबाबत येणाऱ्या तक्रारी गांभीर्याने घेऊन दोषींवर कडक कारवाई करावी, असेही त्यांनी सांगितले.

वाढत्या तापमानामुळे शेतीवर विपरीत परिणाम होत असून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी पाटपाणी व्यवस्थापन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे. हवामान अंदाज लक्षात घेऊन शेतकऱ्यांना पेरणी व कापणीसंदर्भात योग्य मार्गदर्शन करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

नैसर्गिक आपत्तीच्या काळात महसूल व कृषी विभागाच्या अहवालाला महत्त्व असते. त्यामुळे कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता पात्र शेतकऱ्यांना मदत मिळेल याची खात्री करावी. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी अधिकाऱ्यांनी पारदर्शकपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पीक विमा योजनांबाबत सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम केल्यास शेतकऱ्यांना वेळेत भरपाई मिळू शकते. त्यामुळे कृषी, महसूल व पाटबंधारे विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करून शेतकऱ्यांचे हित जोपासावे आणि सामूहिक प्रयत्नांतून खरीप हंगाम यशस्वी करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, गटविकास अधिकारी संदीप दळवी, नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, कृषी अधिकारी मनोज सोनवणे, महाबीजचे कृषी क्षेत्र अधिकारी, मंडळ अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, सहाय्यक कृषी अधिकारी, कृषी सेवा केंद्र प्रतिनिधी, कृषी सेवक तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाथर्डीत गोसंरक्षणाच्या मागण्यांसाठी तहसील कार्यालयावर निवेदन

### गोरक्षण संस्था, विश्व हिंदू परिषद व बजरंग दलासह विविध संघटनांचा सहभाग

**● पाथर्डी । वीरभूमी–**
पाथर्डी शहर व तालुक्यातील गोरक्षण संस्था, गोरक्षण समिती, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल तसेच सकल हिंदू समाजाच्या वतीने गोमाता संरक्षण हक्कांसाठी तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे राज्यभर सुरू असलेल्या गोसंरक्षणाच्या मागणीला पाठिंबा देण्यात आला.



यावेळी दिपक महाराज काळे, मुकुंद गर्जे, बाळासाहेब गिते, घनश्याम नाकिल, भारत लिपारे, शिवनाथ दगडखैर, सोमनाथ बंग, आशुतोष शर्मा, नानासाहेब पालवे यांच्यासह शेकडो गोरक्षक व विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात गोसंरक्षण, गोसंवर्धन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत गोवंशाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शासनाने विद्यमान कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच जनजागृती व संवर्धनासाठी उपाययोजना अधिक बळकट कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

यासोबतच शहरातील मटण व चिकन विक्री व्यवसायांची शासकीय परवाने, स्वच्छता निकष आणि आरोग्यविषयक नियमांनुसार तपासणी करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. नियमांचे काटेकोर पालन होऊन सर्व व्यवसाय पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने चालावेत, ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

तालुक्यातील अवैध कत्तलखान्यांवर नियंत्रण ठेवून गोवंशाचे संरक्षण करावे, गोहत्या बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि कायदा अधिक कडक करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

गोरक्षकांनी भजन–कीर्तन करत घोषणाबाजीसह स्व. वसंतराव नाईक चौकातून मोर्चा काढत तहसील कार्यालयात धडक दिली. प्रांत अधिकारी प्रसाद मते व तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी निवेदन स्वीकारले.

देशभरातील सुमारे ५५०० तहसील कार्यालयांमध्ये एकाच वेळी या अभियानांतर्गत निवेदने देण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. तसेच पंतप्रधान, गृहमंत्री, राज्यपाल आणि सर्व मुख्यमंत्र्यांनाही या मागण्यांबाबत निवेदने सादर करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

सार्वजनिक आरोग्य, स्थानिक भावना आणि कायदा–सुव्यवस्था लक्षात घेऊन प्रशासनाने या विषयाची सकारात्मक दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. या वेळी विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नरसिंह नवरात्र व्रताने भय नष्ट होऊन सकारात्मकता वाढते : सुरासे महाराज

### कान्हेगाव येथे श्रीमद् भागवत कथा; भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**● कोपरगाव । वीरभूमी–**
वैशाख महिन्यात येणारे नरसिंह नवरात्र व्रत श्रद्धेने केल्यास जीवनातील भय दूर होते व नकारात्मक विचार कमी होऊन सकारात्मकता वाढीस लागते, असे प्रतिपादन ह.भ.प. भागवताचार्य सुरासे महाराज यांनी केले.



तालुक्यातील कान्हेगाव येथे नरसिंह नवरात्रानिमित्त आयोजित श्रीमद् भागवत कथेत ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, वर्षभरात चार नवरात्र येतात आणि प्रत्येक नवरात्राचे वेगवेगळे फलित असते. भक्त प्रल्हाद यांचे जीवन वैभवसंपन्न असूनही बालवयात त्यांना प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जावे लागले. मात्र त्यांनी भगवान नारायण यांची भक्ती कधीही सोडली नाही. त्यांच्या दृढ भक्तीमुळे त्यांना भगवतप्राप्ती झाली.

भक्ती बालवयापासून केल्यासही भगवतप्राप्ती होऊ शकते, हा संदेश नरसिंह चरित्रातून मिळतो. विश्वास दृढ असेल तर प्रत्येक कणात ईश्वराचा वास आहे, हे या कथेतून सिद्ध होते. ही कथा ऐकल्याने विद्यार्थ्यांच्या मनात भक्ती जागृत होते व नामस्मरणाचे महत्त्व समजते, असे त्यांनी सांगितले.

नवरात्र काळात सत्य बोलणे, एकनिष्ठ भक्ती करणे, नामस्मरण करणे अशा साधनांमुळे जीवनाला योग्य दिशा मिळते. नृसिंह पुराण मध्ये या व्रताचे मोठे महत्त्व सांगितले आहे. मनुष्य निराश झालेला असताना किंवा विचार भरकटले असताना नरसिंह नवरात्रात भगवान नरसिंह यांची साधना केल्यास ती फलदायी ठरते, असे त्यांनी नमूद केले.

भागवत संप्रदायातील पुराणकथा मानवी जीवनाला बोध देतात व परिस्थितीत समाधानी राहण्याची कला शिकवतात, असेही ते म्हणाले.

नरसिंह मंदिराच्या प्रांगणात सुरू असलेल्या या भागवत कथेला महिला, माता, लहान मुले व भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कथेनंतर दररोज महाप्रसादाचे वाटप केले जात आहे.

# अहिल्यानगर प्राथमिक शिक्षक बँक राज्यात आदर्शवत

### कोल्हापूर शिक्षक बँकेच्या चेअरमन वर्षा केनवडे । शिष्टमंडळाची युपीआयसह योजनांचा घेतला आढावा व स्वतंत्र फेडरेशनची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेची UPI सेवा लवकरच कार्यान्वित होणार असून, त्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर प्राथमिक शिक्षक बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी अहिल्यानगर शिक्षक बँकेला भेट दिली. या भेटीदरम्यान चेअरमन वर्षा केनवडे यांनी बँकेचा कारभार आदर्शवत असून राज्यासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी शिष्टमंडळात व्हाइस चेअरमन पद्मजा मेढे यांच्यासह संचालक सुनील एडके, राजेंद्र पाटील, शिवाजी रोडे, तोहसीफ पटेल, सदाभाऊ कांबळे तसेच आयटी मॅनेजर जाधव उपस्थित होते.

शिक्षक बँकांच्या विविध प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शिक्षक बँकांचे स्वतंत्र फेडरेशन असावे, अशी अपेक्षा माजी चेअरमन शिवाजीराव रोडे पाटील यांनी व्यक्त केली. तसेच, या प्रश्नांची सोडवणूक Reserve Bank of India (RBI) स्तरावर व्हावी यासाठी सर्वांनी एकत्र येऊन नेतृत्व बापूसाहेब तांबे यांनी करावे, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचा कारभार व विविध योजनांबाबत माहिती देताना बँकेचा गौरव करण्यात आला. यावेळी पाहुण्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. बँकेचे चेअरमन गोरक्षनाथ विटनोर यांनी आदर्श कारभारामागे खंबीर नेतृत्व असल्याचे नमूद करत, आमसभा ते संचालक मंडळापर्यंत निर्णय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण केल्यावर भर दिला.

शिक्षक नेते अर्जुनराव शिरसाठ यांनी बँकेबरोबरच विकास मंडळाची मोठी वास्तू उभारण्याचा मानस व्यक्त केला. संघटना व मंडळ यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.

फेडरेशनच्या विषयावर बोलताना शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांनी यापूर्वी सहकार परिषद आयोजित करून नोकरदार बँकांच्या प्रश्नांना वाचा फोडल्याचे सांगितले. बँकांसमोरील आव्हाने व शिक्षक संवर्गातील कमी होणारी पदे यावर एकजूट ठेवून शासनदरबारी पाठपुरावा करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बँकेच्या विविध योजनांवर सविस्तर चर्चा झाली. बँकेकडून कर्जाची कमाल मर्यादा ४८ लाख रुपये असून, दुर्दैवाने सभासदाचा मृत्यू झाल्यास 'सभासद कर्ज निवारण निधी'मधून संपूर्ण कर्ज माफ करण्यात येते. कर्जावरील व्याजदर ७.५० ते ८.४० टक्के इतका कमी असून, कायम ठेवींवर ७ टक्के व्याज दिले जाते. त्यामुळे केवळ ०.५० ते १.४० टक्क्यांच्या फरकात काटकसरीने बँकेचा कारभार चालवला जात आहे.

बँकेकडून शिक्षकांच्या पाल्यांसाठी कै. दादासाहेब दोंदे व कै. भा. दा. पाटील गुरुजी सन्मान योजना राबवली जाते. तसेच पात्र सभासदांना वैद्यकीय मदत दिली जाते. सभासदांच्या मुला–मुलींच्या विवाहासाठी 'शुभमंगल योजना' अंतर्गत ११,००० रुपये, तर



सेवापूर्तीनंतर 'कृतज्ञता निधी' म्हणून ११,००० रुपये दिले जातात.

बँकेची 'कुटुंब आधार योजना' विशेष महत्त्वाची असून, सभासदाचा मृत्यू झाल्यास कुटुंबाला १५ लाख रुपयांची मदत दिली जाते. या सर्व योजनांचे कोल्हापूरच्या शिष्टमंडळाने कौतुक केले. या यशामागे मार्गदर्शक नेते, संचालक मंडळ, संघ–मंडळाचे कार्यकर्ते आणि प्रशासनातील कर्मचारी यांचे योगदान असल्याचे संचालक महेंद्र भणभणे यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी चेअरमन व संचालक बाळासाहेब तापकीर यांनी केले, तर आभार प्रदर्शन संचालक कारभारी बाबर यांनी केले.

या प्रसंगी व्हाइस चेअरमन ज्ञानेश्वर शिरसाठ, संचालक कल्याण लवांडे, बाळासाहेब कापसे, महेश भणभणे, जिल्हा संघ सरचिटणीस प्रकाश नांगरे, मुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत जगताप तसेच बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# महेश भागवत यांची स्वकर्तृत्व व कार्यनिष्ठेच्या बळावर आकाशाला गवसणी

## पाथर्डीच्या सुपुत्राची तेलंगणा पोलिस महासंचालकपदी नियुक्ती । कर्तृत्व, संवेदनशीलता आणि नेतृत्वाचा अनोखा संगम

**● पाथर्डी । वीरभूमी –** तालुक्याचे सुपुत्र तथा महेश भागवत यांनी नुकताच तेलंगणा राज्याच्या पोलिस महासंचालक पदाचा पदभार स्वीकारत आपल्या प्रेरणादायी वाटचालीने संपूर्ण तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. पोलीस दलातील सर्वोच्च पदांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या पदामुळे तालुक्यात अभिमानाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नोकरीत बढती, बदली, नियुक्ती व सेवानिवृत्ती हे चक्र सुरूच असते; मात्र महेश भागवत यांच्या बाबतीत ही चौकट अपुरी ठरते. पोलीस जनतेसाठी ही भावना रुजवत त्यांनी हाती घेतलेल्या प्रत्येक उपक्रमात यश मिळवले आणि आपल्या कार्याने देश-विदेशाचे लक्ष वेधले. कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्व या गुणांच्या एकत्रित वापरामुळे त्यांनी समाजात विशेष आदराचे स्थान निर्माण केले आहे.

पाथर्डी तालुका प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी ओळखला जात असला तरी महेश भागवत यांच्या रूपाने तालुक्याची ओळख जागतिक स्तरावर पोहोचली. त्यांच्या यशामागे जाहिरातबाजी नसून प्रामाणिक कष्ट, नियोजन आणि सामूहिकतेवर असलेला विश्वास आहे. पदाने माणूस ओळखला जातो हे अर्धसत्य असले तरी माणसाच्या कर्तृत्वाने पदाची किंमत वाढते हे त्यांनी सिद्ध केले.

अत्यंत नम्र स्वभाव, शिस्तप्रियता आणि विधायक दृष्टिकोनामुळे त्यांच्या सेवाकाळातील प्रत्येक टप्पा समाजाने आत्मीयतेने अनुभवला. तालुक्यातील सामान्य नागरिकांपासून त्यांच्या मित्रपरिवारापर्यंत सर्वांशी ते आजही तितक्याच आदराने व आपुलकीने वागतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील माणुसकीमुळे त्यांना मोठा जनाधार लाभला आहे.

गावाकडे आल्यानंतर ते 'साहेबपणा' बाजूला ठेवून एक सामान्य माणूस म्हणून जगतात. मानसिक थकवा दूर करून नव्या ऊर्जेसाठी पाथर्डीतील घर त्यांच्यासाठी आधारस्थान आहे. गावाशी असलेली नाळ, मातीवरील विश्वास आणि माणसांवरील प्रेम त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वेगळे स्थान देतात.

१९९५ च्या आयपीएस बॅचचे अधिकारी असलेल्या महेश भागवत यांनी पोलीस दलाला केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरते मर्यादित न ठेवता सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले. मानवी तस्करीविरोधात कठोर कारवाई करत त्यांनी अनेक महिलांना सन्मानाने जगण्याचा मार्ग दिला. त्यामुळे त्यांचे नाव जागतिक स्तरावरही गौरवले गेले.

हातावर पोट भरणाऱ्या मजुरांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय निर्माण करणे, तरुणांना प्रशासकीय सेवेसाठी मार्गदर्शन करणे, आणि सुमारे अडीच हजार आयएएस-आयपीएस अधिकाऱ्यांना घडविणे ही त्यांची मोठी कामगिरी ठरली आहे. त्यांनी शिक्षकी परंपरा जपून समाजाला ज्ञानाचे दालन खुले केले आहे.

त्यांच्या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली असून अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटकडून 'ट्रॅफिकिंग इन पर्सन्स' अहवालातील 'हिरो' पुरस्कार तसेच इतर मानाचे सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत.

राजकीय क्षेत्रात स्व. बबनराव ढाकणे यांनी तालुक्याची ओळख



निर्माण केली होती; त्याच धर्तीवर प्रशासकीय क्षेत्रात महेश भागवत यांनी पाथर्डीचे नाव उज्ज्वल केले आहे.

उच्च पदावर कार्य करताना निष्कलंक व पारदर्शक कारभार ठेवणे ही मोठी गोष्ट मानली जाते. काटेरी मुकुटासारख्या जबाबदाऱ्यांमध्येही त्यांनी समाजाला आधार दिला. गुन्हेगारांविरोधात कठोर, तर सामान्य नागरिकांसाठी संवेदनशील अशी त्यांची कार्यशैली राहिली आहे.

त्यांच्या प्रभावी वक्तृत्व, वाचनाची आवड, तल्लख स्मरणशक्ती आणि विविध भाषांवरील प्रभुत्वामुळे ते सर्व स्तरातील लोकांशी सहज संवाद साधतात. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी ज्ञानाचे मोठे व्यासपीठ उभे केले असून त्याला अनेकजण महेश भागवत विद्यापीठ असे संबोधतात.

महेश भागवत यांचे व्यक्तिमत्त्व आकाशाएवढे उंच आणि क्षितिजाएवढे व्यापक असून त्यांच्या कार्यामुळे तेलंगणा पोलीस दलाचीही प्रतिमा अधिक तेजस्वी होणार आहे. त्यांच्या या यशामुळे पाथर्डी तालुक्याचा प्रत्येक नागरिक अभिमानाने भारावून गेला आहे.

# राज्यभर CET परीक्षेला सुरळीत सुरुवात; तंत्रज्ञानाधारित प्रणालीमुळे पारदर्शकता वाढली

## २८४ केंद्रांवर १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची उपस्थिती

**● अकोले । वीरभूमी –** महाराष्ट्रातील Common Entrance Test (CET) २०२६-२७ परीक्षेला राज्यभरात सुरळीत सुरुवात झाली असून २८४ परीक्षा केंद्रांवर १६ लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. प्रभावी नियोजन, समन्वय आणि सक्षम यंत्रणेमुळे परीक्षा यशस्वीपणे पार पडत असल्याचे चित्र दिसून आले आहे.

या परीक्षेतील विशेष बाब म्हणजे मुलींच्या सहभागात झालेली लक्षणीय वाढ. त्यामुळे स्पर्धात्मक परीक्षांमध्ये समावेशकता आणि समान संधी वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

उएढ सेलचे आयुक्त दिलीप बी. सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि कार्यक्षम करण्यासाठी यावर्षी विविध तंत्रज्ञानाधारित उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

यामध्ये रिअल-टाइम परीक्षा देखरेखीसाठी केंद्रीकृत डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली, सीसीटीव्ही देखरेख, निरीक्षकांसाठी बॉडी कॅमेरे तसेच बायोमेट्रिक पडताळणी यंत्रणा यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांचा अनुभव सुधारण्यासाठी परीक्षा केंद्र वाटप प्रक्रियेतही सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या केंद्रांवर परीक्षा देण्याची संधी मिळाली आहे. तसेच सर्व केंद्रांवर दर्जेदार आणि मानकीकृत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

परीक्षेच्या सुरुवातीच्या टप्प्यात विद्यार्थ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून सुधारित व्यवस्थापनामुळे परीक्षेचा अनुभव समाधानकारक ठरत आहे. उएढ सेल संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवून असून उच्च दर्जाचे आयोजन सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. विशेषतः मुलींच्या वाढत्या सहभागामुळे महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात समावेशकतेकडे होत असलेली प्रगती अधोरेखित होत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# संजीवनी युवा प्रतिष्ठानकडून पशू-पक्ष्यांसाठी अन्न-पाण्याची व्यवस्था

## विवेकभैय्या कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त कोपरगावात स्तुत्य सामाजिक उपक्रम

**● कोपरगाव । वीरभूमी–** कोपरगाव शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांचा वाढदिवस उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची तसेच पक्ष्यांसाठी बर्ड्स वॉटर फीडर्सची व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमाचे कोपरगावकरांनी कौतुक केले आहे.



स्व. शंकरराव कोल्हे यांच्या सेवा हाच धर्म या विचारांचा आदर्श घेत विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी युवा प्रतिष्ठान मागील अकरा वर्षांपासून शहरासह तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. सोमवार (दि. २७ एप्रिल) रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला.

सध्या ४० ते ४५ अंश सेल्सिअसपर्यंत वाढलेल्या तापमानामुळे मुक्या प्राण्यांना व पक्ष्यांना मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज भासत आहे. उन्हाच्या तीव्र झळांमुळे जनावरांसह पक्ष्यांनाही अन्न-पाण्याचा तुटवडा जाणवत असल्याने शहरातील विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या व पक्ष्यांसाठी फीडर्स बसविण्यात आले आहेत.

कोपरगाव शहरात भटक्या जनावरांची संख्या मोठी असल्याने उन्हाळ्यात त्यांना पाण्याची कमतरता भासते. तसेच पक्ष्यांनाही दाणे व पाणी मिळणे कठीण होते. या पार्श्वभूमीवर सुमारे १०० ठिकाणी बर्ड्स फीडर्स बसवून पक्ष्यांसाठी अन्न व पाण्याची सोय करण्यात आली आहे.

या फीडर्सची देखभाल करण्याची जबाबदारी स्थानिक व्यापारी व नागरिकांनी स्वीकारली असून ते नियमितपणे पाणी व दाणे भरून ठेवणार आहेत. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला असून नागरिकांनी या कार्याचे स्वागत करत विवेकभैय्या कोल्हे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

यावेळी कोपरगाव शहरातील भारतीय जनता पक्ष चे कार्यकर्ते तसेच संजीवनी युवा प्रतिष्ठानचे युवा सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'शिवाजी कोण होता?' पुस्तकाचे अकोलेत सामूहिक अभिवाचन

## बळीराजा अभ्यास मंडळाचा उपक्रम । प्रकाशकाला शिवीगाळ घटनेच्या निषेधार्थ शिवप्रेमी एकत्र

**● अकोले । वीरभूमी–** गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे अकोले येथील शिवाजी चौकात सामूहिक अभिवाचन करण्यात आले. छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोककल्याणकारी राज्यकारभाराचे आणि पराक्रमाचे यथार्थ चित्रण असलेल्या या पुस्तकाच्या माध्यमातून वैचारिक भूमिका मांडण्यात आली.

येथील बळीराजा अभ्यास मंडळ व समविचारी संस्था- संघटनांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. अकोले महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. किरण जाधव यांनी ऐतिहासिक संदर्भांसह प्रास्ताविक केले.

अलीकडेच पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना संजय गायकवाड यांनी दूरध्वनीवरून अवमानकारक भाषा वापरून धमकी दिल्याच्या घटनेच्या निषेधार्थ राज्यभर अभिवाचनाचे कार्यक्रम होत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर अकोले येथेही हा उपक्रम घेण्यात आला.

या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे अभिवाचनात प्रा. चंद्रशेखर हासे, तेजस्विनी माघाडे, विजया पाडेकर, डॉ. संदीप कडलग, प्रा. डॉ. महेजबीन सय्यद, आशिष पडवळ, सुनीता रूपवते, प्रा. महेश पाडेकर, स्वरा वैद्य, गणेश ताजणे, अनिकेत वैद्य, प्रतीक वाकचौरे, क्रांती रेवगडे, शिवशाहीर डॉ. मुकुंदा भोर, प्रा. बाळासाहेब मेहेत्रे तसेच अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त गिरजाजी जाधव यांनी सहभाग घेतला. शेवटी अकोल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या अभिवाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### चिमुकलीचाही वाचनासाठी उत्साह

■ मॉडर्न हायस्कूलमध्ये इयत्ता सहावीत शिकणारी ध्रुवी वैद्य ही चिमुरडी अभिवाचनासाठी बहिणीसोबत आली होती. कार्यक्रम सुरू असताना तिने स्वतःहून पुढे येत मलाही वाचायचे आहे अशी इच्छा व्यक्त केली. तिच्या या उत्साहाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते भाऊसाहेब चासकर यांनी विश्रामगडाशी संबंधित छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक संदर्भांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संदेश कासार यांनी केले.



या उपक्रमासाठी डॉ. अजित नवले, डॉ. विजय भगत, रवी रूपवते, अच्युत वैद्य, अनिल मोहिते, अनिकेत घुले, गाथा कल्पना विजय, विशाल शिंदे, गणेश पवार आदींनी परिश्रम घेतले. अभिवाचनाच्या माध्यमातून शिवप्रेमी नागरिकांनी शांततामय पद्धतीने आपली भूमिका मांडत संबंधित घटनेचा निषेध व्यक्त केला.